महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १७६ वे | दिनांक : २१/०६/२०२६ | वार : रविवार

## आता एकच शिवसेना, ती म्हणजे एकनाथ शिंदेंची! कोल्हापूर दौऱ्यात अमित शहांचा टोला



**कोल्हापूर :** केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शहा हे सध्या कोल्हापूर दौऱ्यावर असून आज त्यांनी कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिराच्या जीर्णोद्धाराचे कार्याचे भूमिपूजन केले आहे. यावेळी त्यांनी मंदिराच्या विकासाविषयी महत्त्वाची माहिती दिली. याचसोबत भाषणाच्या सुरुवातीला शिवसेनेच्या खासदारांच्या फुटीवरून टोला देखील लगावला आहे. आता एकच शिवसेना राहिली आहे आणि ती म्हणजे एकनाथ शिंदे यांची, असे त्यांनी म्हटले आहे.

अमित शहा म्हणाले, आता शिवसेनाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्या मागे आधी शिंदे गट म्हणावे लागायचे, आता कोणता गट राहिलेला नाही. आता एकच शिवसेना झाली आहे, असे शहा यांनी भाषणाच्या सुरुवातीला म्हटले आहे.

पुढे बोलताना अमित शहा म्हणाले, आज महाराष्ट्राच्या या पवित्र भूमीवर माता अंबाबाई यांचे निवासस्थान जिथे आहे तिथे आम्ही सगळे खूप चांगल्या कामासाठी एकत्रित आलो आहोत. जिथे माता अंबाबाई शेकडो वर्षांपासून निवास करते त्या करवीर नगरमध्ये त्यांच्या मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम करत आहे. यामुळे पूर्ण कोल्हापुरात, तसेच महाराष्ट्रासह देशभरात अंबाबाई यांच्या भक्तांच्या मनात आनंद आणि भक्ती पाहायला मिळत आहे. 28 हजार 58 वर्ग मीटर भूमीवर बनवला जाणार असून आणि 7 वी शताब्दीमध्ये स्पष्ट रूपाने आकार घेतलेले हे मंदिर पुन्हा एकदा जोमात आणि ऊर्जासह अंबाबाईच्या भक्तांच्या स्वागतासाठी तयार होणार आहे.

अमित शहा म्हणाले, या मंदिराच्या पुनर्निर्माणाच्या कामात पुरातत्व विभागासह चर्चा करून आसपासच्या 41 छोट्या मोठ्या मंदिरांचे संरक्षण करून हे निर्माण कार्य सुरू होणार आहे. संपूर्ण मंदिर परिसराची आधुनिक एआय सज्ज कॅमेऱ्यांसह सुरक्षा सुनिश्चित होत आहे. एलईडीने प्रकाशसज्ज देखील होत आहे, असे शहा यांनी यावेळी म्हटले आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नेते व मंत्री हसन मुश्रीफ यांनी अमित शहा यांच्यावर स्तुतीसुमने उधळली आहेत. ते म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्यानंतर पहिले गृहमंत्री म्हणून सरदार वल्लभभाई पटेल हे कणखर गृहमंत्री म्हणून होते. त्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संस्थाने खालसा केली आणि देश एक करण्याचे काम केले. अशाच प्रकारचा सरदार वल्लभभाई पटेल यांच्यानंतर एक तगडा गृहमंत्री या देशाला मिळाला की जो आपल्या कोल्हापूरचा जावई आहे, याचा आपल्या सर्वांना अभिमान असला पाहिजे.

पुढे बोलताना हसन मुश्रीफ म्हणाले, मी 40-45 वर्षे या सहकाराशी जुळलो आहे. आज जिल्हा मध्यवर्ती बँकेचा 45 वर्षे मी अध्यक्ष आहे. आणि या निमित्ताने जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आणि सहकारी साखर कारखान्याच्या अनेक अडचणी आज आम्ही इचलकरंजीमध्ये त्यांच्यासमोर मांडणार आहोत. या क्षेत्रामध्ये पहिलं पाऊल उचलत त्यांनी विकास सेवा संस्थांचे, त्याचे पॅक्स पुनरुज्जीवन करणे, संघीकरण करणे, हे फार महत्त्वाचे पाऊल त्यांनी उचललेले आहे. सहकारातला एक कार्यकर्ता म्हणून मी मनःपूर्वक त्यांचे अभिनंदन करतो. मी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचेही अभिनंदन करतो. 1400 कोटी रुपये देऊन अनेक वर्षे ज्या आराखड्याची मी वाट पाहत होतो, त्या आई अंबाबाईच्या आराखड्याची सुरुवात या निमित्ताने झाली आहे.

अमित शहा यांच्या भाषणापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील भाषण केले. ते म्हणाले, करवीर निवासिनी महालक्ष्मी अंबाबाई यांच्या प्राचीन मंदिराचे जीर्णोद्धार आणि विकास ज्यांच्या शुभहस्ते झाले ते भारताचे अत्यंत कर्मठ आणि कणखर असे गृहमंत्री अमितभाई शहा यांच्या हस्ते झाले आहे.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज अतिशय आनंदाची गोष्ट आहे की आपल्या सगळ्यांचे जे स्वप्न होते, महालक्ष्मी मंदिर जे पूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे, त्याचा जीर्णोद्धार झाला पाहिजे, ही इच्छा पूर्ण करण्याची सुरुवात आज झाली आहे. महाराष्ट्रातल्या आणि कोल्हापूरकरांची जी इच्छा होती, तीच इच्छा दिल्लीतून एक व्यक्ती व्यक्त करत होते, ती व्यक्ती म्हणजे अमितभाई शाहा. ते म्हणायचे की तुमच्याकडे इतके शक्तिशाली मंदिर आहे, त्याचा विकास अजून पाहिजे तसा झाला नाही. आणि त्यांनी आग्रह केला की जी काही मदत लागेल मी करेल. आपल्या सगळ्यांना माहीत आहे की अमितभाई कोल्हापूरचे जावाई आहेत. अधिकमास झाल्यानंतर अमितभाई आले, मात्र कोल्हापूरकरांचे तुमच्यावर एवढे प्रेम आहे की तुमची सेवा आम्ही आजही करू.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्याला विकास आणि विरासत हा मंत्र दिला आहे. आज आपला वारसा आपली परंपरा याचे प्रतीक असलेले मंदिर म्हणजे महालक्ष्मी मंदिर आहे. या परंपरेत या मंदिराने आमचा आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांना देखील आशीर्वाद दिला आहे. ज्यावेळी संपूर्ण भारतात आमच्या मंदिरांचा विनाश होत होता, त्यावेळी अहिल्यादेवी होळकर यांनी पुनर्जीवन दिले, तीच परंपरा माननीय मोदी यांच्या नेतृत्वात सुरुवात झाली आहे. पुन्हा एकदा आमच्या संस्कृतीकडे आम्ही जात आहोत.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, या मंदिरात जिथे 50 लाख भाविक येतात, तिरूपती बालाजी यांचे दर्शन घेतल्यानंतर महालक्ष्मीचे दर्शन घेतात. भविष्यातले 100 वर्ष या मंदिरात येणाऱ्या भाविकांची सेवा करता यावी साठी आम्ही काम करत आहोत. कोट्यवधी भाविक पंढरपूरला जातील त्यांना ज्या प्रकारचा कॉरिडॉर पाहायला मिळेल, त्यातून पांडुरंग अधिक आशीर्वाद देईल, अशी अपेक्षा फडणवीस यांनी व्यक्त केली. तसेच सगळ्याच शक्तिपीठांचा विकास आपण हाती घेतल्याचे फडणवीस यांनी यावेळी सांगितले आहे.

## RTI मधील बदलांवर अण्णा हजारे संतप्त; फडणवीस सरकारला उपोषणाचा इशारा





**अहिल्यानगर :** देशात आणि प्रामुख्याने महाराष्ट्रात माहिती अधिकार (RTI) कायदा लागू व्हावा यासाठी ऐतिहासिक संघर्ष करणारे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राज्य सरकारच्या नव्या धोरणांवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. राज्य सरकारने नुकतेच एक राजपत्र प्रसिद्ध करून माहिती अधिकार कायद्याच्या नियमांमध्ये अत्यंत जाचक आणि महागडे बदल केले आहेत. या बदलांमुळे माहिती अधिकार कायदा सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाण्याची भीती व्यक्त करत, अण्णा हजारे यांनी फडणवीस सरकारला थेट उपोषणाचा इशारा दिला आहे.

राज्य शासनाने १२ जून रोजी एक विशेष अधिसूचना जारी करत माहिती अधिकार कायदा २००५ च्या अंमलबजावणीच्या नियमांमध्ये मोठे बदल केले आहेत. या नव्या नियमांनुसार, आतापर्यंत केवळ १० रुपयांत मिळणारा माहिती अधिकाराचा अर्ज आता तब्बल ३० रुपयांना मिळणार आहे. इतकेच नाही, तर माहितीच्या प्रतिसाठी (झेरॉक्स) पूर्वी आकारले जाणारे २ रुपये प्रतिपान शुल्क वाढवून आता ५ रुपये करण्यात आले आहे.
सर्वात मोठा फटका अपिलाच्या प्रक्रियेला बसणार असून, पहिल्या अपिलासाठी आता ५० रुपये आणि दुसऱ्या अपिलासाठी १०० रुपये शुल्क मोजावे लागणार आहे.

या नव्या नियमांवर आक्षेप घेत अण्णा हजारे यांनी सरकारला ठणकावले आहे. ते म्हणाले, "माहिती अधिकार हा देशातील सामान्य नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे, ते सरकारसाठी पैसे कमावण्याचे साधन नाही. काही लोक या कायद्याचा गैरवापर करतात हे मान्य आहे आणि त्यासाठी नाममात्र शुल्क आकारणे ठीक आहे, मात्र यातून महसूल गोळा करणे हा सरकारचा उद्देश नसावा. या नव्या १२ नियमांमुळे गरिबांना आणि सामान्य नागरिकांना कोणतीही माहिती मिळवणे अशक्य होणार आहे."

फडणवीस सरकारने हे जाचक बदल तातडीने मागे घेऊन नियम पूर्ववत केले नाहीत, तर आपण या वयातही पुन्हा एकदा जनआंदोलन आणि उपोषणाचे हत्यार उपसणार असल्याचे अण्णांनी स्पष्ट केले.

**राज्य सरकारने माहिती अधिकार कायद्यात केलेले १२ मोठे बदल**

माहिती अधिकार अधिक कडक आणि महागडा करण्यासाठी सरकारने खालील सुधारित नियम लागू केले आहेत:

1.**अर्जाचे शुल्क:** आता ₹१० ऐवजी **₹३०** मोजावे लागणार.
2.**प्रतीचा खर्च:** माहितीचे प्रति पृष्ठ (झेरॉक्स) शुल्क ₹२ वरून **₹५** झाले.
3.**मर्यादित विषय:** एका अर्जाद्वारे केवळ **एकच विषय** विचारता येईल.
4.**शब्दांची मर्यादा:** मुख्य अर्ज आता **१५० शब्दांच्या आतच** लिहावा लागेल.
5.**ओळखपत्र सक्ती:** अर्जासोबत अर्जदाराचे **फोटो ओळखपत्र** जोडणे अनिवार्य.
6.**प्रथम अपील शुल्क:** पहिल्या अपिलासाठी आता **₹५०** फी आकारली जाईल.
7.**द्वितीय अपील शुल्क:** दुसऱ्या अपिलासाठी **₹१००** भरावे लागतील.
8.**वेबसाईटचा हवाला:** मागितलेली माहिती आधीच सरकारी संकेतस्थळावर उपलब्ध असल्यास, विभाग ती तिथून घेण्यास सांगून अर्ज निकाली काढू शकतो.
9.**पुनरावृत्ती अर्ज:** एकाच विषयावर वारंवार केलेले अर्ज थेट बाद ठरवले जातील.
10.**वैयक्तिक माहिती:** कोणाचीही वैयक्तिक माहिती हवी असल्यास, त्यामागे मोठे 'सार्वजनिक हित' आहे हे अर्जदाराला सिद्ध करावे लागेल.
11.**डिजिटल पेमेंट:** ऑनलाईन अर्ज, ई-मेल आणि UPI द्वारे केलेले व्यवहार वैध ठरतील.
12.**अपिलाची सुनावणी:** सुनावणीच्या वेळी तक्रारदार वारंवार गैरहजर राहिल्यास त्याचे अपील फेटाळण्याचा अधिकार अधिकाऱ्यांना असेल.

या नव्या नियमांमुळे माहिती अधिकार कार्यकर्ते आणि सामाजिक संघटनांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण आहे. आता अण्णा हजारे यांनीच थेट उपोषणाचा इशारा दिल्यामुळे राज्य सरकार या नियमांमध्ये काही सवलत देणार की आपल्या निर्णयावर ठाम राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २१ जून २०२६


## जिंतूर-येलदरी रोडवर देशी दारूची अवैध वाहतूक उघड; इर्टिका वाहनासह ५.३४ लाखांचा मुद्देमाल जप्त




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** पोलीसांनी अवैध मद्यविक्री व वाहतुकीविरोधात कारवाई करत येलदरी रोडवरील केहाळ फाटा येथे देशी दारूची अवैध वाहतूक करणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून कारसह एकूण ५ लाख ३४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १६जून २०२६ रोजी रात्री ११:३० वाजण्याच्या सुमारास येलदरी रोडवरील केहाळ फाटा परिसरात संशयास्पदरीत्या फिरत असलेल्या एका पांढऱ्या रंगाच्या इर्टिगा कार (क्र. एमएच २२ ऐएम ४२१४) ची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनामध्ये देशी दारू "भिंगरी संत्रा" या ब्रँडचे १८०एम.एल. क्षमतेच्या काचेच्या सिलबंद बाटल्यांचे १० बॉक्स आढळून आले.जप्त करण्यात आलेल्या मद्यामध्ये एकूण ४८० बाटल्या असून त्यांची किंमत ३४ हजार ८०० रुपये आहे. तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली इर्टिगा कार अंदाजे ५ लाख रुपये किंमतीची असल्याने एकूण ५ लाख ३४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी अखिल बाबामिया कुरेशी (वय ३८) व अकबर बशीर शेख (वय ३५, दोघेही रा. मेंढरे गल्ली, येलदरी कॅम्प, ता. जिंतूर) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (अ) (ई), ८३अन्वये दखलपात्र गुन्हा क्रमांक ३२५/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी फिर्याद पोलीस उपनिरीक्षक भगवान एकनाथ मूजगुळे यांनी दिली असून पोलीस निरीक्षक रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक गुंगाणे करीत आहेत.

## भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी नीलगायीचा मृत्यू; वन विभागाच्या प्रतिसादावर ग्रामस्थांचा संताप



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** तालुक्यातील पिंपळगाव काजळे येथे भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या एका नीलगायीचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी वन विभागाला वेळेवर माहिती देऊनही तातडीने मदत न मिळाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, वन विभागाच्या कार्यपद्धतीबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.वनपरिक्षेत्र प्रादेशिक वन विभाग परभणी अंतर्गत असलेल्या पिंपळगाव काजळे परिसरात गुरुवारी (दि. १८ जून) पाण्याच्या शोधार्थ आलेल्या एका पूर्ण वाढ झालेल्या नीलगायीवर भटक्या कुत्र्यांच्या कळपाने हल्ला चढविला. जीव वाचविण्याच्या प्रयत्नात नीलगाय गावालगतच्या ओढ्यात पडली. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत दोरीच्या सहाय्याने नीलगायीला बाहेर काढले. मात्र कुत्र्यांच्या हल्ल्यात ती गंभीर जखमी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, यानंतर तातडीने वन विभागातील संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच पोलिस प्रशासनाला दूरध्वनीद्वारे माहिती देण्यात आली. जखमी वन्यप्राण्याला तत्काळ वैद्यकीय मदत मिळेल, अशी अपेक्षा ग्रामस्थांना होती. परंतु रात्रभर कोणताही अधिकारी अथवा कर्मचारी घटनास्थळी पोहोचला नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.दरम्यान, गंभीर जखमी अवस्थेत रात्रभर तडफडणाऱ्या नीलगायीचा शुक्रवारी सकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. सकाळी सुमारे साडेनऊ वाजता सामाजिक कार्यकर्ते संजय रामराव आडे यांनी घटनेची माहिती व छायाचित्रे विभागीय वन अधिकारी डॉ. राजेंद्र पुंडलिक नाळे (हिंगोली) यांना मोबाईलद्वारे पाठवून परिस्थितीची माहिती दिल्याचे सांगितले जात आहे.यानंतर सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले व मृत नीलगायीचा ताबा घेतला. त्यामुळे वन विभागाला यापूर्वी माहिती मिळाली होती का? मिळाल्यानंतर कोणती कार्यवाही करण्यात आली? कर्मचारी घटनास्थळी नेमक्या कोणत्या सूचनेनंतर दाखल झाले? असे अनेक प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.विशेष म्हणजे या संपूर्ण घटनेचे व्हिडिओ आणि छायाचित्र पुरावे उपलब्ध असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. तसेच घटनेच्या दिवशीच वन विभागाला माहिती देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.वन्यजीव संरक्षणाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्हउन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे जंगलातील पाणीस्त्रोत आटले असून वन्यप्राणी पाण्याच्या शोधार्थ गावांकडे येत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येत आहे. अशा परिस्थितीत वन्यजीवांसाठी कृत्रिम पाणवठे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि आपत्कालीन बचाव यंत्रणा कितपत प्रभावी आहे, याबाबत या घटनेने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.जखमी वन्यप्राण्यांसाठी तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध आहे का? वन विभागाकडे स्वतंत्र बचाव पथक कार्यरत आहे का? माहिती मिळाल्यानंतर तत्काळ प्रतिसाद देण्याची यंत्रणा सक्षम आहे का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप अनुत्तरित आहेत.भटक्या कुत्र्यांचा वाढता धोकाया घटनेमुळे भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या समस्येकडेही लक्ष वेधले गेले आहे. भटक्या कुत्र्यांकडून वन्यजीवांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायत व संबंधित विभागांनी समन्वयाने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.चौकशीची मागणी- ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, जखमी नीलगायीला वेळेत उपचार मिळाले असते तर तिचा जीव वाचण्याची शक्यता होती. त्यामुळे संपूर्ण घटनेची निष्पक्ष व वस्तुनिष्ठ चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी पुढे येत आहे.दरम्यान, या प्रकरणात वन विभागाची अधिकृत भूमिका जाणून घेण्यासाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र वृत्त प्रसिद्ध होईपर्यंत विभागाकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया प्राप्त होऊ शकली नाही.

ठळक मुद्दे- पाण्याच्या शोधार्थ गावाजवळ आलेल्या नीलगायीवर भटक्या कुत्र्यांचा हल्लागंभीर जखमी नीलगाय ओढ्यात पडली; ग्रामस्थांनी बाहेर काढलेवन विभागाला माहिती दिल्याचा ग्रामस्थांचा दावारात्रभर मदत न मिळाल्याने नीलगायीचा मृत्यूवन विभागाच्या प्रतिसादावर ग्रामस्थांचा संताप- वन्यजीव संरक्षण आणि आपत्कालीन यंत्रणेवर गंभीर प्रश्नचिन्हभटक्या कुत्र्यांच्या समस्येकडे प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी- एका मुक्या वन्यजीवाच्या मृत्यूने वन्यजीव संरक्षण व्यवस्थेतील त्रुटी पुन्हा एकदा उघड केल्या आहेत. आता वरिष्ठ वन अधिकारी व शासन याकडे गांभीर्याने लक्ष देऊन ठोस उपाययोजना करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## गाळमिश्रित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात; जिंतूर नगर परिषद प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** शहरात दूषित व गाळमिश्रित पाणीपुरवठ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जिंतूर नगर परिषदेमार्फत शहरातील विविध प्रभागांमध्ये करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यात काही भागांत पिवळसर, गाळमिश्रित तसेच दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे परिसरात विविध जलजन्य आजारांचा धोका वाढला असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.गेल्या काही दिवसांपासून शहरातील अनेक भागांमध्ये नळाद्वारे येणारे पाणी स्वच्छ नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काही ठिकाणी पाण्यात मोठ्या प्रमाणात गाळ आढळून येत असून पाणी पिवळसर रंगाचे तसेच दुर्गंधीयुक्त असल्याने ते पिण्यास अयोग्य असल्याचे नागरिकांनी सांगितले. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून नगर परिषद प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.नागरिकांच्या मते, जलवाहिन्यांमध्ये गळती होणे, मुख्य पाइपलाइन फुटणे किंवा पाणीपुरवठा यंत्रणेतील तांत्रिक बिघाड यामुळे दूषित पाणी नळांपर्यंत पोहोचत आहे. काही ठिकाणी सांडपाणी किंवा गाळ पाणीपुरवठा लाईनमध्ये मिसळत असल्याचीही शंका व्यक्त केली जात आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला असून विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींना याचा मोठा फटका बसत आहे.दूषित पाण्याच्या समस्येमुळे अनेक कुटुंबांना पिण्यासाठी जारचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. आधीच वाढत्या महागाईमुळे त्रस्त असलेल्या सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असून या परिस्थितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.स्थानिक नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाकडे अनेक वेळा तोंडी तक्रारी केल्याचे सांगितले. मात्र प्रशासनाकडून केवळ "दुरुस्तीचे काम सुरू आहे" असे सांगून वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अद्याप समस्येवर कायमस्वरूपी तोडगा न निघाल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत असून येत्या काही दिवसांत आंदोलनाचा इशारा देखील दिला जात असल्याची चर्चा आहे.नागरिकांनी जिंतूर नगर परिषद प्रशासनाने तात्काळ पाणीपुरवठा यंत्रणेची सखोल तपासणी करावी, मुख्य जलवाहिन्यांमधील गळती किंवा फुटलेल्या पाइपलाइनचा शोध घेऊन त्वरित दुरुस्ती करावी, तसेच पाण्याची गुणवत्ता तपासून शुद्ध पाणीपुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी केली आहे.दरम्यान, पाणीपुरवठा व आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन संबंधित प्रशासनाला आवश्यक सूचना कराव्यात आणि नागरिकांना नियमितपणे स्वच्छ व शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा शहरवासीय व्यक्त करीत आहेत. ■

चौकटदूषित पाण्यामुळे जलजन्य आजारांचा धोकाशहरात होत असलेल्या दूषित पाणीपुरवठ्यामुळे गॅस्ट्रो, डायरिया, उलट्या-जुलाब, पोटदुखी तसेच इतर जलजन्य आजारांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आरोग्य विभागानेही या परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ■

चौकटजारच्या पाण्यावर वाढले अवलंबित्वनळाद्वारे येणारे पाणी पिण्यास अयोग्य ठरत असल्याने अनेक कुटुंबांना जारचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खर्चात वाढ झाली असून आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना याचा मोठा फटका बसत आहे. विशेषतः लहान मुलांच्या आरोग्याची काळजी घेत पालकांना अतिरिक्त खर्च करावा लागत आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २१ जून २०२६


## सुरू झाली शाळा

संपली उन्हाळी सुट्टी
सुरू झाली शाळा
सजला वर्ग
सजला फळा

रांगोळ्यांनी सजले
शाळेचे भव्य मैदान
विद्यार्थी जमा झाले
घेण्या विद्येचे दान

नवे नवे पुस्तक
नवी कोरी पाटी
दोन महिन्यानंतर
मित्रांच्या भेटी

शाळेची वाजली घंटा
लगबग सुरू झाली
नवचैतन्य बहरले
प्रत्येकाच्या गाली

शाळेतील सर्व विद्यार्थी
शिस्तीने रांगेत बसती
बागेतील टवटवीत फुलं
जणू आनंदाने हसती

सर्व विद्यार्थ्यांचा
शाळेवर भारी लळा
मनी एकच ध्यास
स्वच्छ नि सुंदर शाळा




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## धाव धाव रे वरूणा

पेरणीची वेळ झाली,
येऊ दे तुला करुणा.
भुई भेगाळली आता,
धाव धाव रे वरुणा. १

असा कसा झोपलास,
ऊठ राजा झोपेतून.
बळीराजा हाक देई,
फाटलेल्या खोपेतून. २

तुझ्याविना पृथ्वीवर,
खूप उदास वाटते.
झळा उन्हाच्या सोसून,
ऊर बापाचे फाटते. ३

बाप बियाणे आणून,
वाट पावसाची पाहे.
दूर दूर नाही ढग,
पाणी डोळ्यातून वाहे. ४

मृग कोरडेच गेले,
नाही पाऊस मृगाचे.
चिंता लागली मनाला,
कसे होईल जगाचे. ५




नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर


# मराठवाड्यातील वारंवार पडणारा दुष्काळ आणि उपाय योजना

**म**हाराष्ट्रातील मराठवाडा हा दुष्काळग्रस्त प्रदेश म्हणून ओळखला जातो. येथे दर दोन ते तीन वर्षांनी दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते. अनियमित पाऊस, भूजल पातळीतील घट, जंगलतोड, अपुरी जलसंधारण व्यवस्था आणि हवामान बदल यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडतो. दुष्काळामुळे शेतीचे उत्पादन घटते, जनावरांसाठी चारा उपलब्ध होत नाही आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे सरकारने दीर्घकालीन आणि प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे.आता आपण दुष्काळाची कारणे शोधताना मराठवाड्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडतो. पडणारा पाऊसही कमी दिवसांत आणि जोरदार स्वरूपात पडत असल्याने त्याचे पाणी वाहून जाते. जलसाठे, तलाव आणि विहिरी पुरेशा प्रमाणात भरत नाहीत. तसेच पाण्याचा अतिरेकी वापर, ऊसासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांची लागवड आणि जंगलांचे कमी झालेले क्षेत्र यामुळे दुष्काळाची तीव्रता वाढते. खरंतर दुष्काळ निवारण्यासाठी वृक्ष लागवड संवर्धन काळाची गरज आहे.नेमकं तेच वृक्ष धन संपलं तर पडणारं पाणी थेट माती वाहून घेऊन जातं.पृथ्वीच्या जलसाठ्यामध्ये वाढ होण्यासाठी मूळ जंगल गवत याची खूप आवश्यकता असते. पडणारा पावसाचा थेंब झाडावरती गवतावरती पडतो त्या नंतर त्याच्या मुळाद्वारे पृथ्वी मध्ये थेट मुरला जातो.यातून जलसाठ्याची निर्मिती होते. भरपूर वृक्ष असल्याने पृथ्वीवर येणारी सूर्याची किरणे ही झाडावरती येऊन थांबतात यातून तापमान रोखण्यासाठी मदत होते. झाडांच्या पानांमुळे ऑक्सिजन निर्माण होतो आणि वातावरणामध्ये थंडावा टिकून राहण्यास मदत होते. झाडच जतन केली नाहीत तर सूर्य किरने थेट पृथ्वीवरती उष्णता फेकतात.त्याने पृथ्वी गरम होते वातावरनात गर्मी निर्माण होते.मग ऑक्सिजन निर्माण होणार नाही. कार्बन डाय-ऑक्साइड निर्माण होईल. पृथ्वीवरल्या मातीची धूप होऊन पावसासोबत माती वाहून जाईल. पृथ्वीतला पाणीसाठा संपेल आणि एक दिवस पाण्यासाठी जीव मरून जातील.हे दिवस जवळ येत आहेत. त्या आधीच सावरणे अत्यंत गरजेचे आहे. प्रदूषण थांबवावं लागेल. झाडे लावावी लागतील. त्याचं संवर्धन करावे लागेल. नदीकाठ ओढे परिपूर्ण भरभरून झाडे लावावी लागतील त्याचं संवर्धन करावे लागेल. म्हणजे पावसाचं पडणार पाणी थेट वाहून जाणार नाही. माती वाहून जाणार नाही. मातीच संरक्षण होईल. निथळ पाणी पाहायला मिळेल. हे कितीतरी संशोधक आणि अभ्यासकांनी सांगितलं. परंतु ना माणूस विचार करतोय. ना सरकार विचार करते. या परिस्थितीत बदल हवे असतील तर प्रत्येक माणसानं वृक्ष लागवड आणि संवर्धनावरतीच काम करावे लागेल. जलस्त्रोत संरक्षण करणे.पाण्याचा योग्य वापर करणे.उसासारखी पिके घेणे बंद करणे. तरच भविष्यकाळ आपल्यासाठी निसर्ग मदतीला धावणार आहे.अन्यथा येणारे दिवस भयानक असतील याचे प्रत्येक माणसाने चिंतन करणे गरजेचे आहे. जलनायक मधुकर धस सारखं म्हणायचे पाऊस आला दुष्काळाच्या कामाला लागा तो विचार ती भावना आज प्रत्येक माणसाने ध्यानात घेऊन येणाऱ्या काळाला समर्थपणे रोखण्यासाठी आजच काम करावे लागेल.लोक आणि सरकार यांनी करावयाच्या उपाय योजना १. जलसंधारणावर भरगावोगावी शेततळी, नाला खोलीकरण, सिमेंट बंधारे, माती बंधारे आणि पाझर तलाव यांची निर्मिती करावी. पावसाचे प्रत्येक थेंब अडविण्याचे धोरण राबवावे.२. नदीजोड व पाणी पुनर्भरणनद्यांचे खोलीकरण करून अतिरिक्त पाणी दुष्काळी भागात वळवावे. भूजल पुनर्भरणासाठी विशेष मोहिमा राबवाव्यात.३. पीक पद्धतीत बदलशेतकऱ्यांना कमी पाणी लागणाऱ्या ज्वारी, बाजरी, तूर, हरभरा आणि तेलबिया पिकांकडे वळण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. ठिबक व तुषार सिंचनासाठी अनुदान वाढवावे.४. वृक्षारोपण व वनसंवर्धनमोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करावे. जंगलांचे क्षेत्र वाढल्यास पावसाचे प्रमाण आणि भूजल साठे सुधारण्यास मदत होते.५. शेतकरी विमा व आर्थिक मदतपीक विमा योजना अधिक प्रभावी करावी. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ आणि पारदर्शक आर्थिक मदत मिळावी.६. रोजगार हमी योजनादुष्काळी काळात ग्रामीण भागात रोजगार हमी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. जलसंधारणाच्या कामांमधून रोजगार आणि विकास दोन्ही साधता येतील.

७. जनजागृती आणि प्रशिक्षणपाणी बचत, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि हवामानानुसार शेती याबाबत शेतकऱ्यांना नियमित प्रशिक्षण द्यावं लागेल.8. सर्व बोडके डोंगर, दऱ्या, नद्या, खोरे ओढे यापासून शंभर दोनशे मीटर अंतर संरक्षित जंगल म्हणून ते ताब्यात घ्यावं लागेल. उघड्या बोडक्या डोंगरावरती दाट जंगल निर्माण करावा लागेल आणि ते त्याचं संरक्षण करावं लागेल...


**चिंतन:- भूमिपुत्र वाघ**



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
**साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स**
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com


# मुरूमच्या माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये विद्यार्थिनींचा बोलबाला; डी. फार्मसी परीक्षेत उत्तुंग यश



**मुरूम, ता. उमरगा, ता. २० (प्रतिनिधी) :** येथील माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक यशाची परंपरा कायम राखत डी. फार्मसीच्या परीक्षेत नेत्रदीपक कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, या निकालात विद्यार्थिनींनी बाजी मारत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. डी. फार्मसी प्रथम वर्षाचा निकाल ९२.३० टक्के, तर द्वितीय वर्षाचा निकाल ९५.२३ टक्के लागला आहे. डी. फार्मसी प्रथम वर्ष सन २०२५-२६ च्या परीक्षेत लोणी हुमा बेगम हिने ८४.२० टक्के गुण मिळवून प्रथम, कांबळे प्रिया ७४.५० टक्के द्वितीय, शेळके सुप्रिया ७१.६० टक्के तृतीय क्रमांक मिळविला. डी. फार्मसी द्वितीय वर्ष सन २०२४-२५ च्या परीक्षेत मुस्कान कारभारी ८८.१८ टक्के प्रथम, आरती दुधभाते ८०.५५ टक्के द्वितीय, साक्षी पाटील ८०.३६ टक्के तृतीय, वैष्णवी कटारे ७३.९१ टक्के चतुर्थ, तर शितल कटारे ७३.४६ टक्के पाचवा क्रमांक पटकाविला. या यशाबद्दल गुणवंतांचा सत्कार जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांच्या हस्ते शाल, पुष्पहार घालून शनिवारी (ता. २०) रोजी करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे, नगरसेवक सूर्यकांत जाधव, प्रा. डॉ. रवि आळंगे, उपप्राचार्य योगेश पाटील, प्रा. सुदीप ढंगे, प्रा. प्रियंका काजळे, प्रा. वैष्णवी पाटील, प्रा. विनंती बसवंतबागडे, प्रा. रफिक शेख, प्रा. हर्षद बदोले, मल्लिकार्जुन स्वामी, किशोर कारभारी, हर्ष गायकवाड आदी उपस्थितांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थिनींनी मिळवलेल्या या यशाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २१ जून २०२६


# वडील : कुटुंबाचा आधारस्तंभ आणि संस्कारांचे विद्यापीठ



जून महिन्यातील तिसरा रविवार हा दिवस संपूर्ण जगभर 'जागतिक पितृदिन' म्हणून साजरा केला जातो. २१ जून २०२६ रोजी हा दिवस पुन्हा एकदा पितृत्वाच्या गौरवासाठी, वडिलांच्या त्यागासाठी आणि त्यांच्या निःशब्द प्रेमासाठी समर्पित होत आहे. हा दिवस केवळ औपचारिक उत्सव नाही, तर मानवी जीवनातील त्या व्यक्तीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रसंग आहे, जी आपल्या संपूर्ण कुटुंबाचा आधारस्तंभ असते. वडील हे केवळ घर चालवणारे व्यक्तिमत्त्व नसून, ते कुटुंबाच्या भवितव्याचा पाया घालणारे, संस्कारांचे बीज पेरणारे आणि आयुष्यभर न थांबता झटणारे एक अदृश्य शक्तीस्त्रोत असतात. त्यांच्या भूमिकेला अनेकदा शब्द मिळत नाहीत, परंतु त्यांच्या अस्तित्वाशिवाय कुटुंबाची कल्पनाही अपूर्ण ठरते.वडिलांचे व्यक्तिमत्त्व हे अनेक स्तरांनी बनलेले असते. बाहेरून ते कठोर, शिस्तप्रिय आणि गंभीर वाटू शकतात, परंतु आतून ते अत्यंत संवेदनशील, काळजीवाहू आणि प्रेमळ असतात. त्यांच्या भावना सहज व्यक्त होत नाहीत, कारण त्यांनी स्वतःला कुटुंबासाठी एका जबाबदारीच्या चौकटीत बांधून घेतलेले असते. मुलांच्या भवितव्यासाठी स्वतःच्या इच्छा, आकांक्षा आणि अनेकदा स्वप्नांचा त्याग करणारा पिता हा खऱ्या अर्थाने त्यागाचा मूर्तिमंत आदर्श आहे. तो स्वतःच्या आनंदापेक्षा कुटुंबाच्या आनंदाला प्राधान्य देतो आणि हे करताना तो कधीही तक्रार करत नाही.भारतीय संस्कृतीत आई-वडिलांना देवतुल्य स्थान दिले गेले आहे. "मातृदेवो भव, पितृदेवो भव" ही संकल्पना केवळ धार्मिक उपदेश नसून जीवनाचा मूलभूत आधार आहे. आई प्रेम देते, तर वडील दिशा देतात. आई भावनिक आधार देते, तर वडील व्यवहारिक जीवनाची समज देतात. आई जवळ घेते, तर वडील पुढे जाण्यासाठी धैर्य देतात. दोघांच्या भूमिका वेगळ्या असल्या तरी त्या परस्परपूरक आहेत. परंतु वडिलांची भूमिका अधिक शांत, स्थिर आणि जबाबदारीने भरलेली असते.लहानपणी प्रत्येक मुलाच्या आयुष्यात वडील हा पहिला नायक असतो. मुलाला वाटते की त्याचे वडील सर्व काही करू शकतात. ही भावना केवळ बालसुलभ कल्पना नसून त्याच्या आत्मविश्वासाची पायाभरणी असते. वडिलांचे वागणे, बोलणे, निर्णय घेण्याची पद्धत आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हे सर्व मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल परिणाम करतात. त्यामुळे वडील हे केवळ पालक नसून व्यक्तिमत्त्व घडवणारे शिल्पकार असतात.पित्याचे प्रेम हे शब्दांपेक्षा कृतीत अधिक दिसते. तो "मी तुझ्यावर प्रेम करतो" असे फारसे म्हणत नाही, पण ते प्रेम प्रत्येक महिन्याच्या फीमध्ये, घरातील गरजांमध्ये, मुलांच्या पुस्तकांमध्ये आणि त्यांच्या सुरक्षित भविष्यात दिसते. तो स्वतः जुने कपडे वापरतो, पण मुलांना नवीन कपडे मिळावेत यासाठी झटतो. तो स्वतः थकतो, पण मुलांना थकू देत नाही. त्याचे प्रेम न दिसणारे पण सर्वत्र जाणवणारे असते.पिता हा कुटुंबाचा आधारस्तंभ असतो. घरातील आर्थिक स्थिरता, सामाजिक प्रतिष्ठा आणि भविष्यातील सुरक्षितता याची जबाबदारी तो सतत सांभाळतो. अनेकदा तो स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतो, कारण त्याच्या मनात कुटुंबाची चिंता अधिक असते. तो रात्रंदिवस मेहनत करतो, परंतु त्याचा थकवा कुटुंबापर्यंत पोहोचू देत नाही. ही त्याची निःशब्द सेवा त्याला कुटुंबात सर्वात महत्त्वाचे स्थान देते.मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून वडिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. वडिलांचा सक्रिय सहभाग मुलांच्या मानसिक विकासात स्थिरता निर्माण करतो. ज्या मुलांना वडिलांचा आधार मिळतो, ती मुले अधिक आत्मविश्वासपूर्ण, जबाबदार आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम बनतात. वडिलांचा आधार मुलांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करतो, जी त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर परिणाम करते. विशेषतः मुलींसाठी वडिलांचा विश्वास त्यांच्या आत्मसन्मानाचा पाया ठरतो.ग्रामीण भारतातील वडिलांचे जीवन हे संघर्षाचे जिवंत चित्र आहे. शेतकरी वडील निसर्गाच्या अनिश्चिततेशी झुंज देतात. पाऊस, दुष्काळ, बाजारभाव आणि कर्ज यांच्याशी सामना करत ते आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी पैसे उभे करतात. अनेकदा स्वतः उपाशी राहून मुलांच्या भविष्याचा विचार करतात. त्यांच्या या त्यागामुळेच ग्रामीण भागातील अनेक मुले आज डॉक्टर, अभियंते, शिक्षक आणि अधिकारी बनली आहेत.शहरी भागातील वडिलांचे संघर्ष वेगळे असतात. वाढती महागाई, स्पर्धा, नोकरीतील असुरक्षितता आणि सामाजिक अपेक्षा यामुळे त्यांच्यावर मोठा मानसिक ताण असतो. घराचे हप्ते, मुलांचे शिक्षण, आरोग्यखर्च आणि भविष्याची बचत यांचा समतोल राखताना ते स्वतःच्या इच्छांकडे दुर्लक्ष करतात. तरीही ते सतत पुढे चालत राहतात, कारण त्यांना कुटुंबासाठी स्थैर्य निर्माण करायचे असते.आजच्या आधुनिक काळात पित्याची भूमिका बदलत आहे. पूर्वी तो केवळ कमावणारा मानला जात होता, परंतु आता तो मुलांच्या संगोपनात सक्रिय सहभागी झाला आहे. मुलांशी संवाद साधणे, त्यांच्या अभ्यासात मदत करणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांच्यासोबत वेळ घालवणे यामध्ये वडील आता अधिक सहभागी होत आहेत. हा बदल कुटुंबव्यवस्थेला अधिक भावनिक आणि समताधिष्ठित बनवत आहे.वडिलांचे जीवन म्हणजे त्यागाची अखंड कथा आहे. स्वतःच्या स्वप्नांना बाजूला ठेवून मुलांच्या स्वप्नांना पंख देणारा पिता हा निःस्वार्थ प्रेमाचा सर्वोच्च आदर्श आहे. तो स्वतःचे आराम सोडतो, पण मुलांच्या सोयीसाठी झटतो. तो स्वतःच्या गरजा कमी करतो, पण मुलांच्या गरजा पूर्ण करतो. त्याचा प्रत्येक श्वास कुटुंबासाठी असतो.भारतीय साहित्य आणि संस्कृतीत पित्याचे विविध रूपे दिसतात. कधी तो कठोर शिक्षक असतो, कधी प्रेमळ मित्र असतो, कधी संघर्ष करणारा कामगार असतो, तर कधी मुलांच्या भविष्यासाठी स्वतःचे जीवन समर्पित करणारा त्यागी पालक असतो. या सर्व रूपांमधून वडिलांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व स्पष्ट होते.कोविड-१९ महामारीच्या काळात वडिलांच्या भूमिकेचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले. आर्थिक संकट, नोकरी गमावणे आणि आरोग्याच्या भीतीमध्येही त्यांनी कुटुंबाला आधार दिला. अनेकांनी स्वतःच्या गरजा कमी करून कुटुंबाचे रक्षण केले. या काळाने पित्याच्या जबाबदारीची खरी ओळख समाजासमोर आणली.डिजिटल युगात संवाद कमी होत असताना वडिलांनी मुलांशी संवाद वाढवणे आवश्यक झाले आहे. संवाद हा नात्यांचा पाया आहे. मनमोकळा संवाद नातेसंबंध अधिक मजबूत करतो आणि गैरसमज दूर करतो.वडील हे केवळ कुटुंबप्रमुख नाहीत, तर ते संस्कारांचे विद्यापीठ आहेत. ते मुलांना प्रामाणिकपणा, शिस्त, कष्ट आणि जबाबदारी शिकवतात. त्यांच्या सहवासातून मुलं समाजासाठी चांगले नागरिक बनतात.वृद्ध वडिलांची काळजी घेणे ही प्रत्येक मुलाची जबाबदारी आहे. त्यांनी आयुष्यभर कुटुंबासाठी झटले असल्यामुळे उतारवयात त्यांना प्रेम, आधार आणि सन्मान मिळणे आवश्यक आहे. त्यांच्यासोबत वेळ घालवणे ही सर्वात मोठी सेवा आहे.पितृदिन हा भेटवस्तूंचा नाही, तर कृतज्ञतेचा दिवस आहे. वडिलांच्या त्यागाची जाणीव ठेवणे आणि त्यांना प्रेम देणे हेच या दिवसाचे खरे महत्त्व आहे.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पिता हा समाज घडवणारा शिल्पकार आहे. तो मुलांमध्ये मूल्ये रुजवतो आणि राष्ट्रनिर्मितीत योगदान देतो.पित्याचे प्रेम हे आकाशासारखे विशाल, समुद्रासारखे खोल आणि वटवृक्षासारखे सावली देणारे असते. तो स्वतः झिजतो, पण कुटुंबाला उभे करतो.अशा या निःशब्द योद्ध्याला म्हणजेच वडिलांना आजच्या या जागतिक पितृदिनानिमित्त कोटी कोटी वंदन.


**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com


# कर्मयोगी सुभेदार नारायणजी धोंडिबा मोटे: राष्ट्रसेवेचे देदीप्यमान प्रतीक



भारतीय लष्करी इतिहास अशा शूरवीरांच्या गाथांनी सुवर्णमय झाला आहे, ज्यांनी मातृभूमीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. या महान परंपरेतील एक तेजस्वी नाव म्हणजे सुभेदार नारायणजी धोंडिबा मोटे. एका सामान्य कुटुंबातून येऊन राष्ट्रसन्मानाचे शिखर गाठणारा त्यांचा प्रवास हा त्याग, शौर्य आणि निस्वार्थ सेवेची एक अजरामर कथा आहे.प्रारंभिक जीवन आणि संघर्षनारायणजींचा जन्म ७ सप्टेंबर १९४४ रोजी सोलापूर जिल्ह्यातील कासेगाव (उळे) येथे झाला. त्यांचे वडील धोंडिबाजी सातप्पा मोटे आणि माता कृष्णादेवी हे त्यांचे प्रेरणास्थान होते. नियतीने अत्यंत बालपणीच त्यांच्या डोक्यावरून मायेचे छत्र (आईचे निधन) हिरावून घेतले. चार भाऊ आणि एक बहीण असलेल्या मोठ्या कुटुंबात आर्थिक अडचणींचा डोंगर असतानाही, नारायणजींनी हार मानली नाही. सातवीपर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर, कुटुंबाचा आधार बनण्याचे आणि देशाची सेवा करण्याचे स्वप्न उराशी बाळगून, त्यांनी वयाच्या १६ व्या वर्षी भारतीय सैन्यात 'बॉइज बटालियन' द्वारे प्रवेश केला. स्वातंत्र्यसैनिक कुटुंबातील वारसा असल्यामुळे देशभक्ती त्यांच्या रक्तातच भिनलेली होती.लष्करी जीवन: युद्धभूमीपासून सन्मानापर्यंतकेवळ १६ व्या वर्षी सैन्यात दाखल झालेल्या सुभेदार मोटे यांनी ११ मराठा लाईट इन्फंट्रीमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. भारताच्या सुरक्षेसाठी लढल्या गेलेल्या चार ऐतिहासिक युद्धांचे ते साक्षीदार राहिले.भारत-चीन युद्ध,भारत-पाकिस्तान युद्ध (१९६५), भारत-पाकिस्तान युद्ध (१९७१-बांगलादेश मुक्ती संग्राम), भारतीय शांती सेना मिशन (श्रीलंका) या सर्व मोहिमांमध्ये त्यांनी दाखवलेले अदम्य साहस आणि युद्धकौशल्य अतुलनीय होते. त्यांच्या या असाधारण वीरतेची आणि कर्तव्यदक्षतेची दखल घेत, तत्कालीन राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांनी त्यांना विशेष पुरस्काराने सन्मानित केले. हे पदक केवळ त्यांची वैयक्तिक उपलब्धी नसून, राष्ट्रप्रती असलेल्या त्यांच्या निष्ठावान सेवेचा गौरव होता.सीमांपासून समाजसेवेपर्यंतचा प्रवाससुभेदार मोटे यांची सेवा केवळ युद्धभूमीपुरती मर्यादित नव्हती. मिझोरमची घनदाट जंगले असोत, नागालँडचे दुर्गम भाग, जम्मू-काश्मीरच्या बर्फाच्छादित चोट्या किंवा आसाम-ओडिशातील आव्हानात्मक परिस्थिती; प्रत्येक ठिकाणी त्यांनी देशाचे रक्षण केले.सैन्यात कार्यरत असताना त्यांनी एनसीसी (NCC) मध्ये 'हवालदार मेजर' म्हणून महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. नागपूर (कामठी), सोलापूर (अक्कलकोट) आणि बेळगाव सारख्या केंद्रांवर त्यांनी हजारो तरुणांना शिस्त, रायफल शूटिंग, ड्रिल आणि राष्ट्रप्रेमाचे धडे दिले.सेवानिवृत्तीनंतरचा 'कर्मयोग'१९८९ मध्ये २९ वर्षांच्या गौरवशाली सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही त्यांची राष्ट्रसेवा थांबली नाही. त्यांनी आपले उर्वरित आयुष्य समाजसेवेला समर्पित केले. गरजूंची मदत करणे आणि नवीन पिढीमध्ये देशभक्तीचे संस्कार रुजवणे हेच त्यांचे मुख्य ध्येय होते. आपल्या कुटुंबाला त्यांनी दिलेली राष्ट्रभक्तीची शिकवण हीच त्यांची सर्वात मोठी पुंजी आहे."सीमेवर शौर्याची गाथा, समाजात सेवेची ज्योत;राष्ट्रभक्तीच्या ध्येयाने प्रकाशित, कर्मयोगी सुभेदार मोटे यांची जीवनकीर्ती!"सुभेदार नारायणजी धोंडिबा मोटे हे केवळ एक माजी सैनिक नव्हते, तर ते एक 'जिवंत राष्ट्रभक्तीचा धडा' होते. त्यांचे जीवन येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी सदैव मार्गदर्शक ठरेल. त्यांच्या गौरवशाली कार्याला सलाम, अशा महान कर्मयोग्याला विनम्र अभिवादन! त्यांचे शौर्य आणि त्यांचे संस्कार सदैव देशवासीयांच्या हृदयात जिवंत राहतील.



**श्री. भारत कोळी (मामा)**
सेवानिवृत्त नाईक सुभेदार माजी सैनिक, सोलापूर भ्रमण. क्र. ७०३००९३२५७

# महाराष्ट्र जनशक्ती


website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २१ जून २०२६


# जगणं होईल हिरवगार : सृजनशील स्नेहाळू भावनेचा आविष्कार




**बा**लसाहित्यात मोलाचे अधिष्ठान प्राप्त करणारे.बालसाहित्य अकादमी पुरस्कारविजेते.शब्द स्नेही सन्मित्र एकनाथ आव्हाड सर याचा राजहंस प्रकाशनाने प्रकाशित केलेला अत्यंत देखणा कवितासंग्रह 'जगणं होईल हिरवगार'ही कोवळ्या सृजनशील स्नेहाळू मनाची एका अध्यापकांची आर्त हाक ही कविता सांगून जाते.या कवितेचा मर्मग्राही आत्मरंग म्हणजे मातृत्व आहे.जे सृजनशील भावनेतून व्यक्त झाले आहे.विद्येची आराधना करणारा तो विद्यार्थी.त्यांच्यासाठी संस्कार शिदोरी देणारे एकनाथ आव्हाड सर.जगणं हिरवंगार होईल तू फक्त या देहाच्या मंदिरात मायेनं डोकून पहा.तिथे अक्षर आत्मा तुझ्या मनाच्या धारणेतून जगणं होईल हिरवगार.अशी ही निस्सीम माणुसकीच्या धारणेची कविता.जसे " जिवाचा घोर मिटून आता/आशेचा अंकुर/रूजून आला/काळजी वाहणारा तो पुन्हा/ मातीशी एकरूप झाला/जगणं आता हिरवगार होईल/दुखलं मन पुन्हा एकदा/ रिमझिम गाणं गात राहिलं"(पृ.१९)ही मनाची नितळ निर्लेप धारणा आहे.तर प्रकाशाचा उत्सव साजरे करणारे आपण या हिरवाईचा ही उत्सव करूयात कारण जगणंच जर खरतड नकोय ना मग तू खुश होतो 'पहिला पगार'हातात पडल्यावर,आणि 'कृतज्ञता शिल्लक असेल तरच मायेची आठवण येते."जणू या चुकणाऱ्य मुलांसाठी तू परमेश्र् वराकडे माफी मागत होतीसते बघून मला एकदम गदगदून आलं अन् अहंपणाच्या पागोळ्या,तुझी क्षमा मागत तूझ्या डोळ्यातून टपटपू लागल्या."(पृ.२२)ही मातृत्वाची अदम्य् इच्छा पेरणारी कविता.सृजन संवेदनफुलांची अनाघ्रात माला.म्हणजे जिवाचा जिव्हाळा, हिरव्या गर्द मनाचा मनमुक्त सोहळा.ही कवितेच्या ओळीची कृतज्ञता आहे.मन मनाशी बांधली ठेऊन जंगलं की तूम्ही विचारू शकता.संपचं केलातर मनाचा संप कधीचं होत नाही.म्हणून पुस्तकांचा धर्म हा ज्ञानाचा प्रकाश देतं.तोच मनुष्य जन्मास त्याच्या सुखासाठी इंद्रधनुष्य घेऊन येतो आणि डोळ्यात साठवून घे हे सुखाचे रंग ते तूला बेरंग होऊ देणार नाही.बघून घे पाऊस ही मेहरबान होतो आणि ढगांच्या अंगावर इंद्रधनुष्य देऊन त्यांचे अंनत उपकाराचे मनोहरी दर्शन घडवतो.हे सारं या सृष्टीचं वैभव पाहून ही तू जर समजूतदारपणे मनाची गैरहजेरी लावत असेल तर ही उथळ मनाची खळखळ आहे.कवीवर्य एकनाथ आव्हाड जी अतिशय समर्पक समृद्ध सकारात्मक विचारधारेची पेरणी करतात ती अशी "जीवनाच्या मुख्य धारेसोबत/वाहू लागतात झुळझुळ/,आपलेच गढुळलेपण सोडून देतात काठावर/तेव्हा सोपं होऊन जातं जगणं /"(पृ.३३)मानवी जीवनातील 'स्थायिभाव' हा अत्यंत चिंतनशील असेलच असे नाही तर याचा'ताळमेळ'घालता आला पाहिजे.'घर म्हणजे'खरोखरचं एक सृजनशील कवी मनातील नितळ निर्लेप श्रध्देय भावनेचा हा ओलावा आहे.घरात काय मिळते?उब, शांतता, मोकळा श्वास, अस्तित्व, स्वभाव, सहवासाची जोड,अतुरता आठवणी, थोडीशी तगमग या साठी मनाचे नितळ दार उघडे पाहिजे.मौन ही एक मनाची धारणा आहे.मन चिंतीत ते वैरी न चिंती पण जर या साधनेचा साध्यतेतून परिपाक केला तर त्याच्या सारखे कैवल्य सुख नाही याची प्रचीती कवीने अनुभवली आहे.काही अंतरंग उलगडून दाखवणारे कलात्मक भाव आहे त्यातून उत्तम आशय म्हणजे 'जिवाचा जिव्हाळा''शिक्षकाला'विद्यार्थी,आईस लेकरू,तहानेस पाणी, मातृत्वास पान्हा, तसं हे काव्याचं पाझरलेपण ही कविता सांगून जाते जगणं होईल हिरवगार तू फक्त मोह माया,व स्वार्थ सोडून दे!या कवितेचा मर्मग्राही आस्वादक अनुबंध आई आहेच पण कविच्या मनातील अध्यापक ही विद्यार्थ्यांची समकालीन वास्तवाची जाणीव करून देताना त्याच्या हातातील मोबाईल पडला पाहिजे.तास नं तास फेसबूक, त्याच्या वाॅलवरची च्याटिंग, बटनावर बोट,तो मग्न होऊन भग्न होतं चाललेला.या आभासी जगात तो रक्तामासाची नाते विसरत चाललेला.चिडका झालेला.नेट बंद पडलं की,तो या विश्वाशी कुलूपबंद.ही सखेद वेदनेची कविता अशी "असा नव्हताच माझा मुलगा/आक्रंदले माझे मन/बाप म्हणून हरल्याच्या जाणिवेनं/उठली काळजात कळ"/(पृ.६२) ही कविता मन पिळवटून टाकते.मग आपण किती श्रीमंत अहोत.माणुसकी,आपुलकी या आयुष्याच्या झाडाला जिव्हाळ्याची फुले यावीत असा आशावाद ही कविता देऊन जाते.यातील प्रतिमा अतिशय बोलक्या आहेत.तकलादू मोठेपण खुजेपण, पायाला भिंगरी सारखी चाकं अन् अहंकाराची टोकं.आज तुमचा माझा संवाद हरवला आहे.यु ट्युब, इंस्टाग्राम,ट्युटर, फेसबुक, ब्लॉगभर स्वप्नात तो गढून जातो.जगाच्याअन् सभोवतालच्या अत्यंत भंयकर वाईट गोष्टी आम्ही उघड्या डोळ्यांनी हातावर घेऊन मोबाईलवर पाहतो आहोत.क्षणात बित्तंबातमी कळते.मन कळवळते विव्हळते पण निस्तब्धपणे मनात कोरुन घर करते.तेंव्हा कवीची आई अनुभवाचे बोल सांगते.आपण आपल्या मनाशी बोललं पाहिजे.मनाचा आवाज ऐकला पाहिजे.जो आतला आवाज असतो तोच खरा हुंकार असतो.ही सृजनशील स्नेहाळूपणाची भावना ही कविता देऊन जाते.कोणत्याही कवीची कविता ही आईचे अधिष्ठान घेऊन येते या कवितेत 'आईचे तत्वज्ञान' ही विद्या थेट काळजाला भिडते."प्रकृती तर केव्हाही आपलं चालनं बंद करू शकते लेकरा/आता माझ्या मनातलं काहुर/निवळून गेलं/अन् मनात आलं/प्रकृती तिचं काम करत राहते/पण माझी आई/माझ्या प्रकृतीत तिची संस्कृती रुजवून/माझ्या बेढब मनाला आकार देत राहते'(पृ.५२)तसा उन पाऊस मनाचं सुख दु:ख घेऊन येतो तसा बालकांच्या मनातचाही स्वागतशील भाव कल्लोळ असतो दप्तराचा शाळेत जायचा.काही गरीब पोरकी मनोव्यथेची कथन ही कविता करून जाते तर 'देऊळ'होऊन जाते एखाद्या निष्ठावंत निस्सीम भक्तीचा ज्ञानपंढरीचा वारकरी.आपल्या शिक्षिका बाईच्या आठवणीने व्याकुळ होतो.हे ज्ञानाचं देऊळ.तर काही अस्वस्थ करणारे पौराणिक संदर्भ कविच्या चिंतनाचा विषय आशय होते.ज्या उदरातून आईने जन्माचा उध्दार केला तिचा मनस्वी संदर्भ अतिशय चिंतनाचा आहे जसा पाऊस भूमीसाठी तशी आई लेकरासाठी.ही मायेची ओलं देणारी कविता'आय,डोळं का ग लाल झालं तुझं एवढं?'/आभाळागत तूही रडत हुतीस का?'(पृ.६१)ही कविता मानवी मनाच्या संयत मनोभूमिकेतून अतिशय सजग भान देऊन जाते जसे आजच्या संगणकीय युगाचा भयकारी आक्रमक व मुकधारी माणूस आपल्याच कोषात जगतो आहे.त्याला आता फेसबुकवरचं हे विश्व हावं आहे.या युगातील 'आनंदाणच्या भेटीगाठी, सविता पटेकर सतत गैरहजर राहते पण तिच्या मनाच्या दु:ख गाभाऱ्यातला काळोख दुर करणारी ही कविता.अवचित भेट झाली.ही काव्याची मौलिक सृजनशीलता आहे.मनाच्या हळूवारतेचा अनुबंध 'सोबत,केवळ तुझ्यामुळे.तूच एक कविता तिचे सर्वहारा वेदनेचे जगणे ऐकून कवीने उद्विग्न होऊन जाणे.खरं तर हिच धग असते कविता लिहिण्याची 'शब्द होतो दिवा' या तरलबंधात शब्द जर दिवा होऊन आलेतर ती खरी कविता होऊन जाते.आपल्या जगण्याला बाप आधार देतो बालपणी.बापचं आपल्या मनात मनोज्ञ बिजांची पेरणी करतो.पुढे आपल्या हातात 'पुस्तक' येते यात पुस्तक घडविते मस्तक अन् विचार देतात दस्तक.पण आज पुस्तकाच्या मनाचा चोळामोळा केला तर त्याच्या दु:खाची सल कवीने व्यक्त केली आहे.हा 'विश्वास' राव पानिपताचा तसे नाही तो तुमच्या मनमस्तिष्कांच्या खोल तळाशी बसलेला आहे.त्याला जागे करा असा संदेश देणारी ही कविता.शब्द मनाचे हूंकार असतात.शब्दाने मन दु:खी होतात.पण कुणी शुभेच्छा दिल्या तर मन गहिवरून येते आणि मैत्री जोपासणारे नाते घट्ट होते.कविताचा व एका हलवार मनाचा तळ कवीने ढवळून काढला आहे.ही कविता 'नवा आरंभ'करते मनात जे अस्सल नवं साचलं आहे.ते कौशल्यपूर्ण व्यक्त करतं सुविचाराचे संस्कार घेऊन ही कविता येते.शांततेची चाहूल, विचारांची बांधिलकी घेऊन येते तर धमक,ही काट्याकुट्यातून ही जाते.कविता लिहिने म्हणजे आत्मिक स्वानंद ती पोटतिडकी मनातून कागदावर उतरविणे.'लख्ख ऊन,शब्द,'ऑनलाईन'ही मनात मायेचा ओलावा नाही तरीही आभासी जगातील नाते सांगणारी ही समकालीन वास्तवाचे भान देणारी ही कविता आहे.मुली,तू संघर्ष करत रहा. श्रमाची पुजा बांध.एक झाड उगवते प्रत्येकाच्या आत,ही आजची माणसं बेईमान झाली दगाफटका करू लागली.आता पाखरं येतं नाही पिकावर, किंवा मुठभर धान्याच्या मोबदल्यात शेताची राखण करणारी ही दाण्याबरोबर किडेही टिपून खाणारी.म्हणून माणसाने आपल्याही मनात माणुसकीची सावली देणारं झाडं व्हावं.माणसं पुस्तकामुळे भेटत जातात आपुलकीनं शब्दाची विचारपूस करत गळाभेट घेतात.मग हे आत्म्याचं अनुपम भेटणं आहे.असं'अनुपम भेट'ही कविता देऊन जाते.ख्यातनाम बालसाहित्यिक डॉ सुरेश सावंत हे प्रस्तावनेत लिहितात "ही कविता कविच्या स्वभावासारखीच शांत आणि संयत आहे.ती कधीही आक्रमक आणि आक्रस्ताळी होतं नाही.तर वाचक मनाशी सहज संवादी अशी ही कविता आहे.आई हा आपला पहिला गुरु असते.म्हणून कवीला आपल्या आईची शिकवण ही शिकवणी सारखी वाटतं नाही.तर ते तिच्या अनुभवाचं संचित आहे.असे कवीला वाटते.ह्या आईच्या अनुभवसंपन्न मुखातून जीवनाचं तत्त्वज्ञान झिरपते आहे.आपल्या आईच्या आयुष्याची परवड,तिचे दु:ख,तिचे थोरपण,तिचे समर्पन तिचा त्याग तिची हिंमत, आणि तिच्या जीवनाभिमुख शिकवण सांगितली आहे.एकनाथ आव्हाड यांची स्वातंत्र ओळख निर्माण करणारी चिंतनशील अशी ही कविता आहे"(प्रस्तावना) ही कविता मुल्य संस्कार शिदोरी तर देतेच पण एक प्रगल्भ चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक समृद्ध सकारात्मक विचारधारेची ही शिदोरी आहे.हे जगणं होईल हिरवगार म्हणून पाठराखण श्रध्देय साहित्यिक मधु मंगेश कर्णिक सर लिहितात "प्रौढ वाचकांसाठी आपलं हृदय व्यक्त करण्यासाठी प्रस्तुतचा 'जगणं होईल हिरवगार'हा कवितासंग्रह लिहिला आहे. एकनाथ आव्हाड हे एक सुजाण शिक्षक आहे.आणि छोटे साने गुरुजी आहेत.माणूसकीवरील प्रगाढ श्रध्देमुळं जीवनाकडे पाहताना त्यांना 'जगणं होईल हिरवगार'असं वाटणं नैसर्गिक आहे.माणूसकीचा अमर्याद आशावाद उराशी बाळगणाऱ्या एकनाथ आव्हाड यांना अशाच प्रेरक लेखनासाठी माझे आशीर्वाद.(ब्लर्ब) चंद्रमोहन कुलकर्णी यांनी अतिशय आशय संपन्न सृजन मुखपृष्ठ.पनती दिव्याची हिरवी वात गर्द हिरवे पानं वर चंद्राची कमान असे मनोज्ञ भावनीक मुखपृष्ठ.कवीवर्य एकनाथ आव्हाड सर मनस्वी हार्दिक शुभेच्छा.



**जगणं होईल हिरवगार(कवितासंग्रह)**
**कवी:-एकनाथ आव्हाड**
**प्रकाशक:-राजहंस प्रकाशन**
**मुखपृष्ठ:-चंद्रमोहन कुलकर्णी**
**प्रथमावृती:-२७ फेब्रुवारी २०२६(मराठी राजभाषा दिन)**
**परिचय:- डॉ प्रभाकर शेळके,जालना**
**किंमत:-१६०/रुपये**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002